# सिंड्रेला आणि इतर कथा

मंदाकिनी भारद्वाज



परी प्रकाशन

# सिंड्रेला आणि इतर कथा

© सुरक्षित

**प्रकाशक :**
**परी प्रकाशन**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

**प्रमुख वितरक**
**अजब डिस्ट्रिब्युटर्स**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

**मुखपृष्ठ :**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक :**
जयंत प्रिंटरी

**आवृत्ती :**
२९ ऑगस्ट, २०१३

**किंमत :**
रुपये १३०/-


## अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| १. | शामसुंदर | ३ |
| २. | सिंड्रेला | २१ |
| ३. | राजहंस | २८ |
| ४. | अंगुष्टमात्र | ३१ |
| ५. | हॅन्सेल आणि ग्रेटेल | ३५ |
| ६. | निद्रिस्त मोहिनी | ३९ |
| ७. | काडेपेटी विकणाऱ्या मुलीची गोष्ट | ५५ |
| ८. | पीटर पॅन | ५८ |
| ९. | हाइडी | ७६ |
| १०. | टॉमसॉयरची साहसे | ९३ |
| ११. | जादूनगरीत ॲलिस | ११० |
| १२. | लोभी कोळीण | १२८ |
| १३. | नशीबवान हॅन्स | १३४ |
| १४. | शर्यत | १४० |
| १५. | आगळावेगळा वाद्यवृंद | १४३ |
| १६. | तीन शिलेदार | १४७ |
| १७. | बॅस्करविलेचे शिकारी कुत्रे | १६६ |

# शामसुंदर

स्वत:चं कौतुक म्हणून नाही; पण खरं सांगायचं तर मी लहानपणापासूनच फार देखणा होतो. काळाभोर रंग आणि कपाळावर पांढराशुभ्र चांदवा, पायावरही एक पांढराफेक, शोभिवंत रंगाचा मोठासा ठिबका. तसे आम्ही तबेल्यात सहा जण होतो; पण माझ्या आईने –डचेस् तिचं नाव – बजावलं होतं की नेहमी चांगलं वागायचं. अगदी खेळतानादेखील चावायचं नाही, की लाथा झाडायच्या नाहीत. आपलं काम चोख करायचं. वाईट संगतीत राहायचं नाही.

मी आईचं ते सांगणं कायम लक्षात ठेवलं, आणि तसाच वागत राहिलो. म्हणून तर एवढ्या सगळ्या लोकांचा लाडका झालो...



मी चार वर्षांचा झालो तेव्हा मालकांनी मला तयार करायचं, मला भीती वाटू नये म्हणून तसा तयार करण्याचं काम मालक स्वत:च करणार होते. तयार करणं म्हणजे, लगाम आणि खोगीर अंगावर कसं वागवायचं, गाडीला जोडल्यानंतर गाडी कशी ओढायची वगैरे शिकवायचं. एक दिवस मालकांनी मला खूप चुचकारून नंतर लगामाचं कडं माझ्या तोंडात घातलं. सुरुवातीला खूप दुखलं. त्याचा पट्टा माझ्या डोक्यावरून मानेखाली फिरवून, नाक आणि हनुवटीखाली बांधून टाकला.

सर्वत्र घोड्यांना लगामाची सवय करावीच लागते. तशी मलाही हळूहळू लगामाची सवय झाली. खोगीर त्या मानाने कमी त्रासदायक होतं. नंतर खुरांना लोखंडी नाक, डोळ्यांच्या बाजूला कातडी झापडं, शेपटाखालून आलेला खोगिराचा पट्टा. (हा मात्र मला मुळीच आवडत नसे) अशा सर्व साधनांनी सजून मी आता कामाला तयार झालो.

एकदा मालकांनी मला आईबरोबर टांग्याला जुंपलं होतं. तेव्हा आई म्हणाली होती, ''बाळा, तू जितका इमानदारीनं वागशील तितकी चांगली वागणूक तुला मिळेल. आणखी एक गोष्ट पक्की लक्षात ठेव. सर्वच मालक प्रेमळ नसतात. मूर्ख आणि दुष्ट माणसंही या जगात असतात आणि आपल्याला कोणी विकत घ्यावं, हे कधीही घोड्यांच्या हातात नसतं.''

✦

माझे पहिले मालक होते स्क्वाईर गार्डन. मूळच्या मालकाला सोडून जाताना मला वाईट वाटलं. नव्या घरातला तबेला चांगला प्रशस्त होता आणि त्या हवेशीर, स्वच्छ तबेल्यात एक छोटं शिंगरू होतं. करड्या रंगाचं, दाट आयाळ आणि गुबगुबीत शरीराचं. मी त्याला नाव विचारलं. तो होता मेलीलेग्ज. तिसरी घोडी होती, ती तापट होती. पूर्वीच्या मालकांनी तिला चांगलं वागवलं नव्हतं. त्या घोडीचं नाव 'जिंजर'; पण आता जॉन नावाच्या मोतद्दारानं तिला प्रेमानं वागवून तिचा स्वभाव सौम्य केला होता.

एका संध्याकाळी आम्हाला सर्वांना कुरणात चरायला सोडलं होतं. मी सर ऑलिव्हरच्या शेजारीच होतो. त्याची शेपटी एवढी आखूड कशी याचं मला नेहमी आश्चर्य वाटत असे. ती शेपटी खरोखरीच फक्त सहा किंवा सात इंच लांब होती. आता जवळच असल्यामुळे मी कुतूहल पुरं करून घ्यायचं ठरवलं. मी प्रश्न विचारल्याबरोबर, रागाने फुरफुरत तो म्हणाला, ''अगदी दुष्ट आणि लाजवणारं कृत्य होतं ते. अशा गोष्टी ज्या ठिकाणी करतात ना तिथे मला नेलं तेव्हा मी फारच छोटा होतो. मला घट्ट बांधून ठेवलं आणि मग माझी सुंदर, लांबलचक शेपटी कापून टाकली दुष्टांनी ! माझं हाडमांस–देखील कापलं गेलं रे. भयानकच होतं सगळं; पण नुसत्या वेदनांपेक्षा मला वाईट वाटलं, ते इतकी सुरेख शेवटी कापली गेल्यामुळे माझा अपमान झाला ना, त्याचं ! आणि माशा मारायला मला लांब शेपटीच हवी ना.''

''पण मुळात शेपटी कापायचं कारणच काय असतं ?'' मला प्रश्न पडला.

''अरे बाबा, फॅशन. कोणाच्या तरी डोक्यात खूळ शिरलं की शेपटी कापल्यानं घोडे अधिक छान दिसतात; पण त्या मूर्खांना कळत नाही की , जर देवाला वाटलं असतं की घोड्याला आखूड शेपटीच असलेली बरी, तर देवानंच नसती का तशीच शेपटी दिली ? मला तर वाटतं की लगामाचं कडं आमच्या तोंडाभोवती गच्च बांधतात, तो देखील फॅशनचाच प्रकार असावा.'' जिंजर चिडून म्हणाली.

मग यावर सर ऑलिव्हर म्हणाला, ''आता कुत्र्यांचंही ही माणसं काय करतात बघा ना. ते त्यांची शेपटी कापतात आणि कान पाठीमागे पिनेनं बांधून ठेवतात. म्हणजे म्हणे कुत्री गोंडस दिसतात. माझी एक मैत्रीण होती, टेरियर जातीची कुत्री. तिचं नाव 'स्काय् !' तिला पाच छोटी पिल्लं होती. एक दिवस एका माणसाने ती पाची पिल्लं नेली. संध्याकाळी बिचाऱ्या स्काय्‌ने आपली पाची पिल्लं तोंडात धरून परत आणली. तर काय अवस्था झाली होती त्यांची ! सगळी रक्तबंबाळ अवस्थेत रडत होती. सगळ्यांच्या शेपटीचा तुकडा कापलेला आणि कानांच्या नाजूक कोवळ्या पाळ्या कातरलेल्या ! बिचारी आई मुलांना चाटून चाटून शांत करीत होती. काही काळाने त्या पिल्लांच्या जखमा बऱ्या झाल्या आणि ती पोरं दु:खही विसरली; पण धूळ आणि दुखापतीपासून त्यांचं संरक्षण करणाऱ्या त्यांच्या कानांच्या पाळ्या गेल्या त्या गेल्याच ना ! त्यांना एवढं जर सुंदर दिसण्याचं वेड आहे तर, माणसं आपल्या मुलांच्या कानांच्या पाळ्या आणि नाकाचे शेंडे का कापत नाहीत ? म्हणजे ती मुलंदेखील आणखी सुंदर दिसतील ना ? आणि मगच माणसं आमच्याशी ज्या प्रकाराने वागतात ते बरोबर असं म्हणता येईल.''

'मला माणसांची अगदी चीड आली. माणसं इतकी क्रूर होऊ शकतात तरी कशी, याचं मला कोडं पडलं.'

जिंजर म्हणाली, ''माणसं दुष्ट आणि मठ्ठ असतात.''

''मठ्ठपणाविषयी कोण काय बोलतंय् ? चांगला शब्द नाही तो.'' मेरीलेग्जने आपलं मत दिलं.

मग जिंजरनं त्याला सर ऑलिव्हर काय सांगत होता ते सांगितलं, ''कुत्र्यांच्या बाबतीत असं घडताना मी खूपदा बघितलं आहे; पण असं पाहा, जगात वाईट माणसांप्रमाणेच चांगली माणसंही असतातच. या ठिकाणी आपल्याला किती चांगली वागणूक मिळते आहे, याबद्दल आपण आभारीच असायला हवं, नाही का ?'' मेरीलेग्जचं हे शहाणपणाचं बोलणं ऐकून वातावरण शांत झालं. आपले मालक फार चांगले आहेत, सर्वांना आवडतात ते आणि इथलं राहणंही सुखाचं आहे, हे सर ऑलिव्हरने मान्य केलं.

संभाषण थांबलं आणि सर्वच जण गवतावर विखुरलेली गोड सफरचंदं खाण्यात दंग होऊन गेले.

एके दिवशी माझ्या नव्या मालकांच्या मनात आलं की, माझं एखादं छानसं नाव ठेवलेलं असावं. जरासा विचार करून त्यांनी जॉन या मोतद्दाराला आणि जेम्स् या त्याच्या मदतनिसाला बोलावलं आणि विचारलं, ''याला 'शामसुंदर' हे नाव कसं वाटतं तुम्हाला ?''

ते दोघेही खूश होऊन म्हणाले, ‘‘छान आहे.’’ मलाही इतकं वेगळं आणि योग्य नाव मिळालं म्हणून फार आनंद झाला. घर आणि मालक तर मला आवडले होतेच आणि माझ्या काळ्याभोर आणि तुकतुकीत रंगाचा, तसंच कपाळावरच्या चांदव्याचा मला अभिमान होताच ना !

एक दिवस मालक काही कामानिमित्त परगावी निघाले होते. त्यांचा छकडा मला ओढायचा होता. मालकांबरोबर जॉनही होता. छकडा ओढायला मला नेहमीच खूप आवडतं. त्या दिवशी मुसळधार पाऊस पडून गेला होता. आता वादळी वारे वाहत होते. आमचा वेगही चांगला होता. जाताजाता एका लाकडी पुलापाशी आम्ही पोहोचलो. पुलावरचा रखवालदार म्हणाला की, ‘‘नदीचं पाणी भराभर चढतं आहे.’’ रात्र कठीण जाणार बहुतेक. रस्त्याचा काही भाग खोल होता. तिथे माझ्या गुडघ्यापर्यंत पाणी पोहोचत होतं. मालक सावधगिरीने, जपून छकडा हाकत होते.

गावात पोहोचून, गावातली कामं आटोपून परत निघायला आम्हाला चांगलीच संध्याकाळ झाली होती. वारे चांगलेच घोंगावत होते. झाडांच्या नाजूक फांद्या वाऱ्याच्या जोराने तुटून खाली पडून जात होत्या. वाऱ्याचा भीतीदायक आवाज धडकी भरवीत होता. जॉन म्हणाला, ‘‘एखादी मोठी फांदी तुटून आपल्यावर पडली तर ? बाप रे !’’

त्याचं बोलणं संपतं न संपतं तोच बोलाफुलाला गाठ पडावी तसं एक मोठं ओकचं झाड काडकाड आवाज करत मुळापासून उपटलं जाऊन रस्त्यात आडवं पडलं. तेही आमच्या अगदी पुढेच ! देवदयेने आम्ही वाचलो होतो. मी तर भयंकर घाबरलो होतो, अगदी थरथर कापत होतो; पण पळून मात्र गेलो नाही. जागीच उभा राहिलो होतो.

‘‘आता काय करायचं ?’’ मालक म्हणाले.



‘‘मला वाटतं, आपण त्या लाकडी पुलाकडेच परत जाऊया.’’ जॉन म्हणाला.

पुलापर्यंत जाईस्तवर बऱ्यापैकी अंधार पडला होता. पुलाच्या मध्यभागी पाणी चढलेलं दिसतच होतं. आमचा वेग चांगला होता. त्यामुळे काही क्षणाचत माझे पाय पुलावर टेकले; पण त्याच क्षणी मला जाणवलं की, काहीतरी बिघडलं आहे. नेहमीसारखं वाटत नाही.

मग मी जागीच उभा राहिलो.

‘‘चल बेटा शामसुंदर, चल.’’ मालक मला चुचकारीत म्हणाले. त्यांनी हातातल्या चाबकाने मला हळूच स्पर्शही केला; पण मी ढिम्मच ! मग त्यांनी मला हलकासा फटका मारला. तरी मी हललो नाही.

म्हणून मग जॉन पुढे सरसावला. ‘‘शामसुंदर, अरे, झालं तरी काय ? चल ना, पुढे जाऊया.’’ आता मी त्याला काही सांगू शकत नव्हतो; पण पूल सुरक्षित नव्हता हे मला जाणवत होतं. तेवढ्यात, हातातल्या दिवटीचा उजेड आमच्याकडे पाडीत पुलाचा रखवालदार धावत येताना दिसला.

तो म्हणाला, ‘‘पूल मधोमध तुटला आहे. तुम्ही त्यावरून जायचा प्रयत्न केलात तर नदीत पडाल.’’

‘‘देवाची कृपाच म्हणायची.’’ मालक म्हणाले.

‘‘वा ! शामसुंदर, वाचवलंस.’’ माझा लगाम धरून मला हळुवारपणे वळवीत जॉन बोलला.

आता वारा शांत झाला होता. अंधार वाढत चालला होता. मी दुडक्या चालीनं रस्ता कापत होतो. जॉन आणि मालकांना आता कळलं होतंच की, पुलावरून जायचं नाकारून मी त्यांचा जीव वाचवला होता. मालक म्हणत होते, ‘‘माणसाला कार्यकारण भाव कळतो आणि सामान्यज्ञान असतंच; पण प्राण्यांमध्ये ते विशेष प्रमाणात असतं आणि त्याचा उपयोग करून ते आपल्या जिवलगांचं रक्षण करीत असतात. तरीदेखील प्राण्यांना द्यायला हवी त्याच्या निम्मीदेखील किंमत माणसं देत नाहीत.’’ यावर मालक आणि जॉन यांचं एकमत झालं.

घरी पोहोचलो तर मालकीणबाई काळजी करीत वाट पाहत होत्या. ‘‘किती उशीर ? काही वाटेत झालं बिलं का ?’’ त्या विचारू लागल्या.

मालक म्हणाले, ‘‘शामसुंदरने आमचा जीव वाचवला.’’ आणि ते दोघे बोलत बोलत आत गेले. आणखी काही मी ऐकलं नाही.

खूप थकलो होतो. जॉनने मला चवदार खाणं दिलं आणि छान गवताचा बिछाना घालून दिला. मी मग झोपून गेलो.

✦

जेम्सला एक चांगली संधी चालून आली होती. मालकाच्या मेहुण्याला एका चांगल्या मोतद्दाराची जरूरी होती. मालकांनी त्या कामासाठी जेम्सला पाठवायचं ठरवलं होतं आणि त्याला गाडी हाकण्याची चांगली सवय व्हावी म्हणून मला आणि जिंजरला गाडीला जुंपून जेम्सनं शहरात

फेरफटका मारावा, असं सांगितलं. त्याप्रमाणे जेम्स् आमच्यासह शहरातल्या वेगवेगळ्या ठिकाणी फिरला. मला खूपच मजा आली.

✦

मालक आणि मालकीणबाई मित्रांना भेटायला निघाले होते. पहिल्या दिवशी जेम्सने बत्तीस मैलांची मजल मारली होती; पण त्याचं गाडी हाकणं इतकं कौशल्याचं होतं की आम्हाला एवढ्या धावण्याचा काहीच त्रास वाटला नाही. आम्ही उतरलो होतो त्या विश्रामगृहाच्या शेवटी घोड्यांसाठी तबेले होते आणि दोन मोतद्दारांसाठी खोल्या होत्या. एका माणसानं मला तबेल्यात नेलं आणि स्वच्छ केलं. आणखी एका घोड्याला स्वच्छ करतानाच, तिथे एक माणूस येऊन मोतद्दाराशी बोलू लागला. त्याच्या तोंडात पाईप होता. मोतद्दारानं त्या माणसाला पाईप ठेवून देऊन, गवत आणून द्यायला सांगितलं. त्यानंतर तबेल्याचा दरवाजा बंद झाला आणि रात्री तबेल्यात आमचे आम्ही राहिलो.

रात्री मला अस्वस्थ वाटू लागलं आणि जाग आली. गुदमरल्यासारखं होत होतं. जिंजर आणि इतर घोडे खोकत होते. सगळा तबेला जसा धुरानं भरून गेला होता. त्यातून सगळीकडे अंधारच अंधार !

तबेल्याच्या छतातला छोटा दरवाजा उघडा होता. बाहेर कसले तरी आवाज येत होते. एक मोतद्दार येऊन, हातातल्या कंदिलाच्या प्रकाशात घोड्यांना मोकळं करून बाहेर न्यायचा प्रयत्न करीत होता; पण घोडे बाहेर जाईनात. मीही तसाच वागलो. गेलो नाही बाहेर. हे आमचं वागणं मूर्खपणाचं वाटेल कदाचित्; पण काय चाललं आहे हे काहीच कळत नव्हतं. शिवाय, विश्वास ठेवावा असं कोणी दिसतही नव्हतं.


उघड्या दारातून ताजी, मोकळी हवा आत आली, तेव्हा जरा बरं वाटलं. त्याबरोबर जेम्सचा आवाज आला, ‘‘चला, चला, माझ्या लाडक्यांनो, बाहेर पडायला हवं आपल्याला. जागे व्हा आणि इकडे या.’’

मी दरवाजाजवळ होतो म्हणून तो पहिल्याने मला त्या पेटलेल्या तबेल्यातून सुखरूप बाहेर घेऊन गेला. बाकी सगळे घोडेही बाहेर पडले.

जेम्स् थकला होता. मालकाने त्याला या बहादुरीबद्दल शाबासकी दिली. जेम्स्‌चा जायचा दिवस जवळ येत चालला, आणि एक ज्यो ग्रीन नावाचा पोरगा त्याच्या जागी आला. तो एवढा छोटा होता की आमच्यासाठी काम करणं त्याला शक्य नव्हतं. मग जॉननं त्याला मेरीलेग्ज्‌चं काम करायला शिकवलं.

जेम्स्‌सारखा चांगला मोतद्दार आम्हाला सोडून गेला याचं सर्वांनाच वाईट वाटलं; पण जाणं त्याच्या भल्यासाठीच होतं.

✦



एके रात्री घंटेच्या कर्कश्श आवाजाने दचकून मी जागा झालो. जॉननं तबेल्याचा दरवाजा उघडला आणि तो म्हणाला, ''चल बेटा, शामसुंदर. तुला जितकं वेगानं धावता येईल तेवढ्या वेगानं धावत जायचंय् आपल्याला.''

आणि काय होतंय् ते मला कळायच्या आतच त्यानं मला खोगीर चढवलं, लगाम घातला आणि मला घेऊन तो दिवाणखान्याच्या दाराशी पोहोचला. ''आपल्या मालकिणीचा जीव धोक्यात आहे, तिला वाचवणं तुझ्या हातात आहे. जेवढ्या वेगानं जाता येईल तेवढ्या वेगानं टांगा घेऊन जा, आणि ही चिठ्ठी डॉ. राईट् यांना दे, आणि शक्य तितक्या लवकर परत ये.'' असं बटलरनं जॉनला सांगितलेलं मी ऐकलं. तसा मग मी जिवाच्या कराराने दौडू लागलो. लवकरात लवकर दोन मैल काटले. 'त्या' लाकडी पुलावर आलो. जॉननं माझी मान थोपटली. ''शाब्बास, राजा. असाच चल.'' म्हणाला.

डॉक्टरांच्याकडे आम्ही पोहोचलो तेव्हा पहाटेचे तीन वाजले होते. मालकिणीच्या आजाराबद्दल ऐकताच डॉक्टर लगेच यायला तयार झाले; पण त्यांचा घोडा आजारी होता. ''तुमचा घोडा घेऊन मी जाऊ का ?'' त्यांनी जॉनला विचारलं. खरं तर मी फार दमलो आहे, हे जॉनला माहीत होतं; पण डॉक्टरांनी घरी पोहोचून मालकिणीवर उपचार करणे, हे देखील तेवढंच महत्त्वाचं होतं.

मी आणि डॉक्टर निघालो. डॉक्टर काही उत्तम स्वार नव्हते. वयानेही मोठे होते; पण मी माझ्याकडून शिकस्त केली आणि लवकरच घरी पोहोचलो. मालकांनी डॉक्टरांना घरात नेलं.

मी कमालीचा थकलो होतो. माझे पाय थरथरत होते. घामानं पुरता भिजलो होतो. सगळं अंग वाफाळल्यासारखं झालं होतं. ज्योनं माझी काळजी घेतली खरी; पण गरम पांघरूण माझ्या अंगावर

घातलं नाही, की मला गरम पाणी प्यायला दिलंही नाही. गार पाणी, गवत आणि मका माझ्यापुढे ठेवला. तेवढ्यानं त्याला वाटलं की झालं आपलं काम ! मग तबेला बंद करून तो गेला निघून.

मला खूप थंडी वाजायला लागली. जॉनची खूप आठवण यायला लागली; पण तो तर डॉक्टरांच्या घरून पायी चालत येत होता. खूप वेळाने केव्हातरी जॉनची चाहूल लागली. मी कण्हलो. त्याबरोबर तो आत आला. माझी अवस्था बघून दोनतीन गरम गोधड्या आणून त्यानं माझ्या अंगावर टाकल्या. घरातून गरम पाणी आणलं. ज्योवर रागावला; पण त्यानं काही ते जाणूनबुजून केलं नव्हतं.

मी खूपच आजारी झालो. श्वास घ्यायला त्रास होऊ लागला. शेवटी घोड्यांचे डॉक्टर आले. त्यांच्या औषधांनी मी हळूहळू बरा होऊ लागलो. जॉन म्हणायचा, ''मालकीणबाईंचे प्राण तू वाचवलेस आणि आता तुझी काय ही दशा !'' आणि सगळ्यांना सांगायचा, ''मी माझ्या आयुष्यात शामसुंदर जेवढ्या वेगाने दौडत होता, तेवढ्या वेगाने दौडणारा दुसरा घोडा बघितला नाही.''

ते ऐकून मला अगदी धन्य धन्य वाटायचं !

आमच्या मालकीणबाईंच्या आजाराबद्दल आम्ही मधूनमधून ऐकत होतोच. डॉक्टरदेखील बरेचदा येत असत. मालक नेहमी गंभीर आणि उदास असायचे. मालकीणबाईंना हवाबदलाची आवश्यकता आहे, असं ऐकलं. मालक हे घर सोडून जाण्याच्या तयारीला लागले. त्यांनी मला आणि जिंजरला एका जुन्या मित्राला विकलं. तो आमची चांगली काळजी घेईल, असं त्यांचं म्हणणं होतं.

शेवटी त्यांचा जाण्याचा दिवस उजाडला. मी आणि जिंजरने गाडी अगदी दिवाणखान्याच्या तोंडाशी आणली. मालक मालकिणीला उचलूनच घेऊन आले. आम्ही सावकाश रेल्वे स्टेशनवर आलो. मालकांनी सर्व नोकरांचा निरोप घेतला. मालकीणबाई जॉनला म्हणाल्या, ''जॉन, मी तुला कधी विसरणार नाही. देव तुझं नेहमी भलं करो.''

जॉनला बोलवत नव्हतं. तो मालकांसोबत फलाटावर गेला. ज्यो आमच्याजवळ उभा राहून आसवं गाळीत होता.

लवकरच आगगाडी आली. मालक-मालकीणबाई त्यातून गेल्या. आम्ही घरी परतलो; पण आता ते घर आमचं राहिलं नव्हतं.

✦

दुसऱ्या दिवशी सकाळी न्याहारी केल्यानंतर जॉन मला आणि जिंजरला घेऊन आमच्या नव्या घरी गेला. तिथे मिस्टर यॉर्क नावाच्या माणसाशी तो बोलला. मि. यॉर्क मोठे रुबाबदार गृहस्थ दिसत होते. त्यांनी आम्हाला काही विशेष खोडी आहेत का, याची चौकशी जॉनकडे केली. त्यानं जिंजरला पूर्वी मिळालेल्या वाईट वागणुकीबद्दल सांगितलं आणि म्हटलं की, ''परत तसंच झालं तर, ती बिथरण्याची शक्यता आहे. तेव्हा ती काळजी घ्यायला हवी. घट्ट लगामाची त्यांना सवय